## मा. मंत्री (महसूल), महाराष्ट्र राज्य यांचे न्यायालयात

**क्रमांक :-** आरटीएस-२०२२/प्र.क्र.३१०/ज-४

१. श्री. राजदक्ष महेंद्र शर्मा — अर्जदार
२. श्री. कपिल महेंद्र शर्मा
कार्यालय - वास्तू, कोलबाडा नाका,
जुना मुंबई आग्रा महामार्ग, ठाणे (प).

**विरुध्द**

१. मेसर्स श्रध्दा डेव्हलपर्स — जाबदार
तर्फे भागीदार
श्री. नितीन जमनादास तेजुरा
कार्यालय - अ/१०१, ज्योती पार्क,
ज्योती कॉम्प्लेक्स, एस.व्ही रोड,
कांदिवली (प) मुंबई.
२. मेसर्स रवि डेव्हलपर्स.
तर्फे भागीदार
श्री. जयेश शहा व श्री. केतन शहा
तर्फे धारक,
श्री. कन्हैयालाल रामसुरत गुप्ता
कार्यालय - ७६, लक्ष्मी पॅलेस,
रोड, कांदिवली (प) मुंबई ४०००६७.
३. उप जिल्हाधिकारी (अपीले), ठाणे.
४. सह रजिस्ट्रार ॲश्युरन्स, ठाणे.

(राधाकृष्ण विखे-पाटील)
मंत्री
महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०००३२

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २५८ नुसार पुनर्विलोकन अर्ज**
**पुनर्विलोकन अर्जा लगतच्या स्थगिती अर्जावरील निर्णय**

१. अर्जदार यांनी तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांचे आदेश क्रमांक : आरटीएस २७१७/१९/प्र.क्र.१६/ज-४, दिनांक २७.१.२०२१ या आदेशामुळे व्यथित होऊन प्रस्तुतचा पुनर्विलोकन अर्ज सादर केला आहे. पुनर्विलोकन अर्जा लगत अर्जदार यांनी स्थगितीचा अर्ज देखील सादर केला आहे. सदर प्रकरणी दिनांक १२.१२.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. आव्हानित आदेशास स्थगिती मिळण्या संदर्भात अर्जदार यांचे अधिवक्ता यांनी सुनावणी वेळी मौखिक युक्तीवाद केला.

२. मौजे भाईंदरपाडा ता. व जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. १०९ हिस्सा क्र. १९/ब क्षेत्र २६५० चौ.मी ही प्रस्तुत प्रकरणातील वाद मिळकत आहे.

३. अर्जदार यांच्या कथनानुसार, वाद मिळकत मूलतः श्री. भोईर कुटुंबियांनी धारण केली असून त्यांनी दि. ८.९.१९९९ रोजीच्या नोंदणीकृत दस्ताद्वारे वाद मिळकतीची विक्री अर्जदार यांच्या लाभात केली

होती. त्याप्रित्यर्थ फेरफार नोंद क्र.३०३ ही नोंद योग्यरीत्या अभिलिखीत करुन मंजूर करण्यात आली होती अर्जदार यांनी दि. १.७.२०११ रोजीच्या नोंदणीकृत विकसन करारनामाद्वारे वाद मिळकतीमधील विकसना हक्क मे. बालाजी इंटरप्रायझेस यांच्या लाभात तबदिल केले होते. तद्नंतर मे. बालाजी इंटरप्रायझेस यांन सक्षम प्राधिकारी यांच्याकडून रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम आराखडा / नकाशा मंजूर केल्या प्रित्यर्थ मे बालाजी इंटरप्रायझेस यांच्या लाभात सक्षम प्राधिकारी यांनी प्रारंभ प्रमाणपत्र निर्गमित केले होते. वा मिळकतीमध्ये मे. बालाजी इंटरप्रायझेस यांचे हक्क/अधिकार/हितसंबंध असताना देखील तत्कालीन मा. मं (महसूल) यांनी मे. बालाजी इंटरप्रायझेस यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामावून न घेता सदोषरीत्य आव्हानित आदेशाद्वारे अर्जदार यांच्या लाभातील आव्हानित फेरफार नोंद क्र.३०३ ही नोंद रद्द केली आहे. य पार्श्वभूमीवर तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या आव्हानित आदेशाची अंमलबजावणी झाल्यास अर्जदा यांचा मिळकतीमधील हक्क संपुष्टात येऊन अर्जदार यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. यास्त तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या आदेशास स्थगिती देण्याची विनंती अर्जदार यांनी केली.

४. अर्जदार यांचा युक्तीवाद, तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांचे आव्हानित आदेश व प्रकरणाती कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर प्रकरणी निम्नस्तरीय न्यायासनांकडील इतर आवश्यक ती कागदप प्राप्त करुन घेऊन प्रस्तुत पुर्नविलोकन अर्ज अंतिमत: निर्णय करण्यास काही कालावधी लागणार आहे. त पर्यन्त तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या आव्हानित आदेशास स्थगिती न दिल्यास अर्जदार यां अपरिमित नुकसान होईल, या युक्तीवादाशी मी सहमत आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्या येतात :-

## आदेश

१. तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांचे क्रमांक - आरटीएस २७१७/१९/प्र.क्र.१६/ज-४, दिनां २७.१.२०२१ रोजीच्या आदेशाच्या अंमलबजावणीस प्रकरणाच्या अंतिम निर्णयापर्यन्त स्थगिती देण्यात यते

२. सदर निर्णय सर्व संबंधितांना कळविण्यात यावा.

३. प्रकरणाच्या सुनावणीचा दिनांक व वेळ निश्चित करुन मिळण्यासाठी प्रकरण सादर करण्यात यावे.

( राधाकृष्ण विखे पाटील)
मंत्री (महसूल)

स्थळ : मुंबई
दिनांक : १२/१२/२०२२

(राधाकृष्ण विखे-पाटील)
मंत्री
महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

प्रत,
उप सचिव ( ज-४ कार्यासन), महसूल व वन विभाग

(अवर सचिव)
महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२



RMO/STAYORDER